# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक २२ जून २०११** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.०१**
**२२ जून २०११**

नागरी आरोग्य केंद्र, कातकरीपाडा आणि नागरी आरोग्य केंद्र, ऐरोली विभागाचा सन २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ च्या लेखा परिक्षण अहवालाबाबत, महापालिका मुख्य लेखा परिक्षकांचे दि.१२/०५/२०११ चे पत्र क्र. नमुंमपा/लेपवि/४७/२०११.

**ठराव क्र.११४.**
**निर्णय:-** **आयुक्तांकडे अभिप्रायासाठी.**

**विषय क्र.०२**
**२२ जून २०११**

रुपये पन्नास हजारापेक्षा जास्त परंतु दहा लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.१३/०६/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/१३३७/२०११.

**ठराव क्र.११५.**
**निर्णय:-** **दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.०३**
**२२ जून २०११**

मोरबे धरण प्रकल्प अंतर्गत भोकरपाडा येथील ३०० द.ल.लि. प्रतिदिनी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र, पंपीग मशिनरी, सब स्टेशन, एम. सी. आर. एम. बी. आर, शुध्द पाण्याचा संप इ. परिचलन व सर्व समावेशक देखभाल दुरुस्ती तसेच जलशुध्दीकरण केंद्राकरिता आवश्यक ती रसायने पुरविण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.०९/०६/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा /श.अ./१५०८/२०११.

ठराव क्र.११६.
**२२ जून २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.मनोज कंस्ट्रक्शन कं. या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५ टक्के जास्त दराने एकूण रु.२,५६,५६,०९५/- इतक्या खचाने प्रथम वर्षासाठी करार करण्यास तसेच पहिल्या वर्षाच्या कामाची प्रगती पाहून सदर काम त्यांना पुढील दोन वर्षे देणेस सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:-** **संमत.**

| | |
|---|---|
| **विषय क्र.०४** <br> **२२ जून २०११** | बेलापूर विभागातील से-१२ येथील स्ट्रॉम वॉटर पंपहाउस मधील १२५ एच.पी. व ३५० एच.पी. पंपाची एम.एस.पाईपलाईन बदलण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.१४/०६/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा /श.अ./१५८०/२०११. |
| ठराव क्र.११७. <br> **२२ जून २०११** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. ए. के. इलेक्ट्रीकल्स ॲन्ड वर्कस् या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.०० टक्के जास्त दराने एकूण रू.१८,२१,६०४/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी." |
| **निर्णयः-** | **संमत.** |